॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव. दि १९ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष निवडीसाठी कार्यवाही सुरु करण्यात आली असून निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे.

१५ व १६ मे रोजी ही निवडणूक होणार आहे. कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी भ.भा.पाटील यांनी हा निवडणूक कार्यक्रम जाहिर केला असून विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर इलेक्शन पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आला आहे. अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष निवडीसाठी पात्र मतदारांच्या यादया देखील १६ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आल्या आहेत. अध्यक्ष पदासाठी ४ मे रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. ७ मे रोजी अर्जांची छानणी होऊन वैध व अवैध अर्जांची यादी जाहीर होईल. ८ मे रोजी या यादी संदर्भात दु.१.३० वाजेपर्यंत कुलगुरुंकडे अपिल करता येईल. १० मे रोजी या अपिलावर कुलगुरु निर्णय देतील. ११ मे रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. ११ मे रोजी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी जाहीर होईल तर १५ आणि १६ मे रोजी मतदान होईल. १५ व १६ रोजी होणाऱ्या निवडणूकींचा निकाल मतदान झाल्यानंतर लगेच जाहीर केला जाणार आहे.

---

जा.क्रः उमवि/१६/हस्तदेय/२०१८ — दिनांक : १९ एप्रिल,२०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी